SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004 MAHARASHTRA
Phone : EPABX-2609000 Stat Cell : 0231-2609147.
Fax : 0091-231-2693294 website : www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर — ४१६ ००४ — महाराष्ट्र
दूरध्वनी: (ईपीएबीएक्स)२६०९००० सांख्यिकी कक्ष : ०२३१-२६०९१४७.
फॅक्स : ००९१-२३१-२६९३२९४ E-Mail : statcell@unishivaji.ac.in
Estd : 1962
NAAC 'A' Grade

जा.क्र./शिवाजी वि./सांख्यिकी कक्ष/एआयएसएचई/२०१८-१९/No 1279 दिनांक : 02 FEB 2019

# परिपत्रक

प्रति,
प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्नीत महाविद्यालये / मान्यता प्राप्त संस्था,

**विषय : अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम सन २०१८-१९**
डीसीएफ मध्ये माहिती भरणे व अपलोड करणेबाबत...

**संदर्भ :** १) मा.डॉ. धनराज माने, शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्र .उशिसं/सांख्यिकी/एमआयएस/२०१८-१९/१९६३८ दिनांक ०४/१२/२०१८ रोजीचे पत्र.
२) जा.क्र./शिवाजी वि./सांख्यिकी कक्ष/एआयएसएचई/२०१८-१९/१९३, दिनांक :११ डिसेंबर, २०१८ रोजीचे परिपत्रक
३) जा.क्र./शिवाजी वि./सांख्यिकी कक्ष/एआयएसएचई/२०१८-१९/२२६, दिनांक :२५ जानेवारी, २०१९ रोजीचे परिपत्रक

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांनी अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम २०१८-१९ वेबपोर्टलवर माहिती नोंद करण्याबाबत कळविलेले आहे. सदर वेबपोर्टलवर (www.aishe.gov.in) माहिती नोंद करण्याची सुरवात दिनांक ०३/१२/२०१८ पासुन झालेली आहे. या अनुषंगाने विद्यापीठाशी संलग्नित महाद्यालयांनी आपली प्रशासकीय, शैक्षणिक, व शैक्षणिकेत्तर बाबींची सन २०१८-१९ करीता दिनांक ३० सप्टेंबर हया संदर्भ दिवसा पर्यंतची माहिती नोंद करावयाची आहे. शिक्षण संचालनालय उच्च शिक्षण पुणे कार्यालय यांच्याशी झालेल्या चर्चेनुसार व संदर्भ क्र. ३ च्या परिपत्रकाने दिनांक ०२/०२/२०१९ पर्यंत वेबपोर्टलवर माहिती नोंदविण्यात यावी असे कळविण्यात आले होते. परंतू अद्यापी ज्या महाविद्यालयांनी माहिती अपलोड केलेली नाही अशा महाविद्यालयांची यादी दि. ०५/०२/२०१९ रोजी पुणे येथे होणाऱ्या आढावा बैठकीवेळी सादर करण्यास कळविण्यात आले आहे. तसेच सदर माहिती नोंद न केलेल्या महाविद्यालयांची यादी मा. विभागीय सहसंचालक कोल्हापूर विभाग यांना पुढील कार्यवाही करीता पाठविण्यात येणार आहे.आपल्या महाविद्यालयाची माहिती AISHE पोर्टलवर नोंद केली नसल्यास सदर माहिती दि. ०४/०२/२०१९ पर्यंत तात्काळ नोंद करून विद्यापीठास सहकार्य करावे ही विनंती.

वेबपोर्टलवर माहिती नोंद करत असता कांही अडचण निर्माण झाल्यास महाविद्यालयांच्या नोडल अधिकारी यांनी सांख्यिकी कक्ष, खोली क्रमांक ३१३ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. दुरध्वनी क्रमांक ०२३१-२६०९१४७ येथे संपर्क साधावा.

कळावे.

आपला विश्वासू,
(signature)
उपकुलसचिव